VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ६. मराठा साम्राज्य – जातीव्यवस्था आणि बलुतेदारी पध्दत

**प्रा. बोराडे तानाजी रामभाऊ**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम.

**प्रस्तावना**

भारतीय समाजाचे आर्थिक जीवन हे कष्टाचे आणि श्रमाचे आहे. या समाजाला जास्तीत जास्त कष्ट सुध्दा हवे तेवढे उत्पन्न शेतीतून मिळत नाही. उदरनिर्वाहासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टाचा भार हा शेती आणि संबधीत व्यवसाय व गृहउद्योग, मजुरी आणि नौकरी हे या समाजात प्रचलीत आहेत व यातुनच भारतीय अर्थव्य आकाराला आलेली आहे. पारंपारिक आणि आधुनिक दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेसंबंधी असलेल्या आर्थिक कि भारतीय आर्थिक जीवनात समावेश झालेला आहे. ''तेव्हा भारतीय समाजाचे आर्थिक जीवन हे जातीव्यवस्था व उदयाला आलेली बलुतेदारी पध्दती यावरच भारतीय समाज पूर्णतः अवलंबून आहे''[1]

समाजव्यवस्थेत समाजातील सर्व लोक वेगवेगळया पण निश्चित स्वरूपांच्या स्तरामध्ये विभाजीत दिसून येतात. समाजातील हे विभाजन हे काही विशिष्ट बाबीवर अवलंबून असते. हे विभाजन करताना फक्त ज घटकाचाच आधार घेतलेला असतो. तेव्हा अशा विभाजनास 'जातीव्यवस्था' असे म्हणतात. या व्यवस्थेत व्य श्रेष्ठत्व किंवा कनीकत्व हे तिच्या जन्मावरून ठरविले जाते. या प्रकारची स्तररचना फक्त भारतातच होती. ब्रम्हदेश, बांगलादेश, नेपाळ या कांही पौर्वात्य देशामध्ये ही स्तर रचना आढळून येते.

भारतीय समाजात हिंदू धर्मीय समाज रचना ही जातीनिष्ठ स्वरूपाची आहे. हिंदु समाज हा वेगवेगळया आणि उपजातीमध्ये विभागलेला आहे. या सर्व जाती आणि उपजातीची श्रेष्ठ–कनिष्ठ अशी उतरती श्रेणी आहे ब्राम्हणांना श्रेष्ठ मानले जाते. तर अस्पृश्य समजलेल्या जातींना कनिष्ठ समजले जाते. व आजही काही प्रमाण मानसिकता टिकुन आहे.

जात म्हणजे काय? हे समजुन घेण्यासाठी कांही विचावंताच्या व्याख्या पाहु.

1. मुजुमदार व मदन– ''जात हा एक बंदिस्त वर्ग आहे.''
2. प्रा. मुखर्जी– ''संपुर्णतः अनुवंशीकतेवर आधारलेल्या वर्गास जात असे म्हणतात.''

जाती व्यवस्थेने व्यक्तीवरती अनेक बंधने घातलेली आहेत. व्यक्तीने विवाह, खाणे–पिणे, विवाह, मित्र व्यवसाय इ. आपल्या जातीतच करावे लागतात.

''प्रत्येक जातीला सार्वजनीक व्यवहारात श्रेष्ठ–कनीष्ठतेनुसार कांही अधिकार, सत्ता लाभलेले अ कनीष्ठ जातींना राजकीय, सामाजिक, आर्थीक, शैक्षणिक बाबीसंबधी अधिकार नाकारण्यात आले पारतंत्र्यापासून ते स्वातंत्र्यानंतरही हिंदु समाजात जाती व्यवस्थेचे प्रस्थ दिसुन येते.

S.P. Mahavidyalaya, Bhoom • Tq.Bhoom Dist • Bhoom

**...व्यवस्थेची वैशिष्ट्ये**

**अनुवंशीकता**– व्यक्तीची जात तिच्या जन्मावरून ठरविण्यात येत असल्यामुळे जातीला जन्म तत्व ... गट म्हटले जाते. अनुवंशिकतेच्या तत्वानुसार व्यक्ती ज्या जातीच्या आई वडीलाच्या पोटी जन्म घेते ... जातीची ती सदस्य बनते. म्हणजे व्यक्तीचा जाती–दर्जा तिच्या जन्मावरून ठरविला जातो. व्यक्तीला ... मिळालेला दर्जा बदलता येत नाही. मनात नसतानाही हा दर्जा स्वीकारावा लागतो.

**ठळक गट**– वर्ग व्यवस्थेत दोन वर्गामध्ये कांही अंतर असते. कोणता वर्ग कोठे सुरु झाला कोठे संपल्या ... सांगता येत नाही. कारण दोन वर्गात मर्यादा स्पष्ट नसते. प्रत्येक जात म्हणजे स्पष्ट व ठळक ... असतो.

**श्रेष्ठ–कनिष्ठ दर्जा**– सर्व जातीचा दर्जा समान नसतो. कांहीना श्रेष्ठ तर कांहीना कनीष्ठ समजले जाते. ... जी स्तर रचना उच्च–मध्यम–कनीष्ठ अशा उतरत्या क्रमाने असते. हिंदु समाजात ब्राम्हण श्रेष्ठ तर अस्पृश्य (मांग) कनीष्ठ जात समजली जाते. तसेच सर्व जातीचे दर्जे वेगवेगळे असतात.

**पारंपारीक व्यवसाय**– सध्याच्या परिस्थीतीत पारंपारीक व्यवसायाची सक्ती कोणत्याही जातीवर केली जात नाही. पुर्वी ती केली जात असे. आधुनिक काळात औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षण इ. बाबीच्या प्रभावामुळे कोणताही व्यक्ती तिच्या कुवतीप्रमाणे कोणता ही व्यवसाय करू शकते. पारंपारीक व्यवसायाच्या संदर्भात तिच्यावर सक्ती करता येत नाही. कोणतेही सामाजिक, नैतिक, कायदेशीर बंधन राहीलेले नाही.

**सामाजिक व्यवहारातील बंधन**– जाती व्यवस्थेत मुक्तपणे संबध ठेवण्यास मनाई असते. एका जातीच्या व्यक्तीला दुसऱ्या जातीच्या व्यक्ती बरोबर खाणे–पिणे सोयरीक इ. संबध ठेवता येत नाही. रोटी व्यवहाराबाबत अशी शिथीलता असली तरी बेटी व्यवहाराबाबत कडक बंधने आहेत. आपल्या जातीतच विवाह करावा असे प्रत्येक व्यक्तीवर बंधन असते. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर समाजातुन बहिष्कृत होण्याची पाळी येते.

**धर्माचा आधार**– जाती व्यवस्थेस धार्मीक पाठींबा मिळालेला आहे. कर्म व पुर्नजन्माच्या तत्वज्ञानाचा संबध जाती व्यवस्थेशी जोडण्यात आलेला आहे. जात ही परमेश्वर निर्मीत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीने ती मानली पाहिजे असे बंधन घालण्यात येते. परमेश्वराच्या मुखातुन ब्राम्हण, बाहुतुन क्षत्रीय, जांघेतून वैश्य, व पायातुन क्षुद्र निर्माण झालेले आहेत.आपआपसात योग्य ते अंतर ठेवून धर्म नियमांना अनुसरून वर्तन केले पाहिजे. या नियमांचे उल्लंघन केल्यास मृत्यूनंतर नरकात जावे लागेल व पुढच्या जन्मी कनिष्ठ योनीत जन्म घ्यावा लागतो. असे धर्मशास्त्राचा आधार घेवून सांगीतले जाते.

**सामाजिक व धार्मीक निर्बंध** – जातीनिष्ठ समाजरचनेस प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक जीवनावर जाती व्यवस्थेचा प्रभाव पडलेला असतो. विवाह, कुटुंब, राजकीय, धार्मीक, शिक्षण इ.क्षेत्राचे कार्यक्षेत्र जाती व्यवस्थेने बंदीस्त केलेले होते. त्यामुळे व्यक्तीच्या आवडी–निवडी महत्वकांक्षा इवर जाती व्यवस्थेचा प्रभाव पडलला होता. त्यामुळे व्यक्तीला स्वतंत्र व स्वच्छंदी जीवनास पारखे व्हावे लागते.

...P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist...

**बलुतेदारी पध्दती**

भारतीय समाज हा पारंपारिक पदधतीने शेती करणारा आहे. शेतकऱ्याना शेतीची सर्वच कामे ये नाही म्हणून शेतीला पूरक व्यवसाय करण्यासाठी अनेक कारागीर तयार झाली. महाराष्ट्रात 12 बलुतेदार आलुतेदार निर्माण झाले. बलुतेदारांना कारो आणि आलुतेदारांना नारो असे म्हणू लागले व हे शेतकऱ्यांना व्यवसाय होते. ज्या व्यावसाईकांची प्रगानरूप गरज पडत असे त्यांना आलुतेदार किंवा नारो असे म्हणत बलुतेदार आणि आलुतेदार ग्रामीण आर्थिक व्यवस्थेशी निगडीत होते तसेच या सर्व व्यावसायीकांचा संबध शे शेतकऱ्यांशी जोडलेला होता.

1. गावातील पाटील आणि पटवारी यांना सरकारी कामांत चौगुला मदत करीत असे. चावडीची करणे आणि चावडीवर पाटील व पटवारी सांगेल ती कामे त्याला करावी लागत. या मोबदल्यात शेतकऱ्याकडून अन्नधान्य वगैरे मिळत असे. सध्या चौगुला म्हणजे हा व्यवसास अस्तित्वात नस ग्रामपंचायतीची कामे करण्यासाठी कोतवाल हा पगारी नोकरी सेवेला असतो.
2. पाटील आणि पटवारी यांच्या मदतीला सरकारी कामे करण्यासाठी महार आणि मांग असत. असल्याने त्यांना गावातील इतर कामेसुध्दा करावी लागत. अशा कामात कौशल्यापेक्षा कष्टांना महत्व दिले जात असे.
3. महार हा मांगापेक्षा महत्वाचा बलुतेदार होता. काही ठिकाणी अलुता म्हणून त्याचे महत्व होते. महाराकडे सरकारी कागदपत्रे परगावी पोहोचविणे, लोकांना महत्वाच्या प्रसंगी चावडीत बोलावून मेलेली जनावरे ओढणे, गावची स्वच्छता ठेवणे वगैरे बलुता म्हणून कामे करावी लागत. मांगांना महाराबरोबर गावात दवंडी पिटविणे, डफडे वाजविणे, वेशीला तोरण बांधणे, बैलाला ठेचणे वगैरे प्र कामे करावी लागत. परंतु सदय परिस्थितीत महाराचा व्यवसाय पूर्णपणे बंद झाला असला तरी व्यवसाय कसावसा तग धरून आहे. आजही डफडे वाजविणे आवश्यक समजले जात असल्याने देणे, लग्न, मुंज, जावळ, जत्रा, मृत्यू इत्यादी प्रसंगी मांगाला डफडे वाजवावे लागते. शिवाय टोपले आणि दोरखंड तयार करण्याचे काम चालू आहे. परंतु या व्यवसायाला बलुता म्हणून जी होती ती संपली आहे. "पूर्वी महाराणी मांगांना त्यांच्या सेवेच्या मोबदल्यात शेतकरी अन्नधान्याच्या मदत करीत असत." आज मांगाचा व्यवसाय शेतीला पूरक असला तरी आधुनिक तयार वस्तू शेतकऱ्यांना हव्या असतात त्या बाजारात मिळत असल्याने मांगाचा व्यवसाय तोटयात चालतो.
4. शेतकऱ्यांसंबंधी पुरक व्यवसाय सुतारकी असल्याने सुतार हा बलुतेदार महत्वाचा समजला जात वखर, नांगर, तिफण, कोळपी, जाडी, जू, शिवळ यासारख्या शेतकऱ्याला उपयुक्त वस्तू बनवून सुताराचे काम असते. सध्याही हा व्यवसाय बलुतेदाराच्या नावाखाली चालू असला तरी अनेक ठिका इतर जातीच्या लोकांनी सुरू केला असल्याने सुताराच्या पारंपारिक व्यवसायाची घसरण सुरू झाली
5. शेतीसाठी आवश्यक असणारी सर्व लोखंडी अवजारे तयार करून मोबदल्यात शेतीतली काही घेण्याचा लोहाराला अधिकार होता. आजही हा व्यवसाय तग धरून आहे. परंतु पूर्वीसारखी अवस्था रा

S.P. Mahavidyalaya, Bhoom Tq.Bhoom Dist.O.bad

नाही. वखराची पास, तिफणीचे फण, कुऱ्हाड, नांगराचा फाळ, वखराच्या विडया वगैरे बनविण्याचे काम लोहाराला करावे लागते.

बलुतेदार म्हणून चांभाराला अत्यंत महत्व होते. मोट पादत्राणे, आसुडासाठी पान वैगेरे तयार करून शेती आणि शेतकऱ्याला तो मदत करून मोबदल्यात धान्य घेत असे. आजही हा व्यवसाय आहे, परंतु अवस्था मात्र घसरली आहे.

न्हावी हा सुध्दा महत्वाचा बलुतेदार होता. आजही न्हाव्याचे महत्व फारसे कमी झालेले नाही. गावातील जे लोक सदस्य समजले जात त्यांची दाढी आणि डेकीचे केस काढण्याचे काम त्याला करावे लागते. आज मात्र म्हैस भादरण्याचे बंद झालेले दिसून येते. शेती कामासाठी त्याचा प्रत्यक्ष उपयोग होत नसला तरी शेतकऱ्यासाठी मात्र तो उपयोगी होता आणि आहे.

खेडयातील लोकांना उपयोगी पडणारा आणखी एक बलुतेदार म्हणून कुंभाराकडे बघावे लागते. मातीची भाडी तयार करून देणे व मोबदल्यात इतरबलुतेदाराप्रमाणे काही ना काहीतरी शेतकऱ्याकडून मिळविण्यातच त्याचा हक्क अबाधित होता. आज मात्र कुंभाराची बलुता म्हणून गणती केली जात नाही. पूर्वीसारखी मातीची भांडी व्यवहारात कमी झाल्याने त्यांचा धंदा ओहोटीला लागला आहे.

कपडे धुण्याचे काम परिट करित असे. लग्न, जावळ, मुंज, मृत्यु इत्यादी प्रसंगी यजमान आणि पाहुण्यांचे कपडे त्याला धुवावे लागत. आज ही मात्र अवस्था संपत्ती श्रीमंताच्या घरचे कपडे धुण्याचे व अगदी काहितरी मिळविण्याचा उद्योग चालू आहे.

कोळी हा बलुतेदार म्हणून समजला जात असला तरी प्रत्येक गावात त्याचे पाणी भरण्याचे काम त्याला करावे लागत असे.

देवळाची व्यवस्था ठेवणे म्हणजे झाडलोट करणे, दिवा बत्ती लावणे, देवपूजा करणे आणि घरोघर विशिष्ट दिवशी बेल घालण्याचे काम त्याच्याकडे असे. पत्रावळया, द्रोण बनवून देणे व तूतारी वाजविणे इ.कामे गुरवाला करावी लागत. मात्र आज नाममात्र गुरवाचे अस्तित्व आहे. बलुता म्हणून महत्व नाही.

सोनाराकडे सोने, चांदी, तांबे, कथिल वगैरे धातु पासून नवे आणी जूने दागिने तयार करून देण्याचे काम होते. शिवाय कान, नाक टोचणे व लग्नाच्या प्रसंगी देवाच्या नवीन मुर्ती तयार करून देण्याचे काम सोनाराकडे होते. वर्तमानकाळात सोनाराचे महत्व भुतकाळात विलीन झाल्याने बलुतेदार म्हणून त्यांच्या नावाचा उल्लेखही केला जात नाही.

**सूची**

दा.धि.काचोळे – ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, पृ.95
दा.धि.काचोळे – ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, पृ.100

S.P.Mahavidyalaya, Bhoom
BHOOM
Tq.Bhoom Dist.O.bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya, Bhoom,
Dist.Osmanabad